# बृहन्महाराष्ट्र वृत्त

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

On the web
www.bmmonline.org

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र
उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

फेब्रुवारी २००९
वर्ष २९, अंक २

## संस्थापकीय



वृत्ताच्या वाचकांशी बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी श्री गिरीश ठकार यांचे प्रथमत: आभार मानते. यापूर्वी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या यंदाच्या अधिवेशनाचे लेखी निमंत्रण पाठवून अधिवेशनाच्या कार्यकारिणीने मला सुखद धक्का दिला होता! खरं म्हणजे घरच्या कार्याला निमंत्रणाची आवश्यकता नसते. तरीही आठवणपूर्वक दाखवलेल्या अगत्याने निश्चितच भारावल्यासारखे झाले. बृ.म. मंडळात बदललेल्या वाऱ्याची झुळूक मला गिरीश सारथी झाल्यावर त्याने माझ्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला तेव्हाच आली होती. त्यानंतर कार्यकारिणीने नृपोशी सहकार्य, मराठी शाळा संकल्पना, मराठी उद्योजकांसाठी NAME, वृध्दांसाठी कल्याण केंद्रे, कलाकारांचे गुणदर्शनाचे विविध कार्यक्रम असे सध्याची गरज ओळखून अनेक उपक्रम मंडळाच्या उद्दीष्टांनुसार आखले व कार्यान्वित केले. जुन्या जाणत्यांना मान देऊन, नव्यांना प्रोत्साहित करून केवळ सेवा भावनेने या सर्व उपक्रमांची जोपासना करण्यात गेले दीडवर्ष गिरीश आणि सहकारी मग्न दिसतात. आता इच्छा एवढीच की ही प्रवृत्ती आणि प्रकृती पुढीलांपर्यंत जावो.

बृहन्महाराष्ट्र मंडळ ८० साली स्थापन केले. त्यावेळची गरज म्हणून बृहन्महाराष्ट्र वृत्तही तेव्हा हस्तलिखित स्वरूपात मुखपत्र–बातमीपत्र म्हणून सुरू केलं. ८४ साली पहिले अधिवेशन शिकागोत भरवले. ४ जुलैच्या सुट्टीतच. त्या गोष्टीला २५ वर्षें लोटली. अजूनही अधिवेशने लोकांना हवीशी वाटतात. यातच सारे काही आले.

मंडळ आजवर टिकून आहे, वृत्तदेखील चालू आहे याचा आनंद वाटतो. आणि त्यामागे अनेक कार्यकर्त्यांचे परिश्रम आहेत याची पूर्ण जाणीव आहे व त्यांचे मला कौतुकही आहे. 'हेही नसे थोडके' पण संस्था व्हायला हवी तेवढी बळकट झाली नाही. ती मराठमोळ्या शक्तीचे केंद्र बनू शकली नाही याची खंत मात्र वाटते. कदाचित् दर दोन वर्षांनी होणाऱ्या बदलांमुळे मूळ उद्दीष्टांशी एकसंधता, एकतान टिकवता आली नसेल. 'नवी विटी, नवे राज्य' कार्यपध्दतीत 'संस्थेसाठी व्यक्ती असते, व्यक्तीसाठी संस्था नाही' ही मूळ विचारप्रणाली हरपून गेली असेल. परिणामी मंडळ बहरले. लोकेषणा झाली. पण लोकाश्रय लाभला नाही. लोकसंग्रह वाढला. पण लोकप्रेम जाणवले नाही. यापुढे येणाऱ्या सारथ्यानी जर हा जगन्नाथाचा रथ आखलेल्या मार्गाने कार्यरत केला, एकेक उद्दीष्ट पार करीत आगेकूच करण्याचे ठरविले तर अजूनही या शक्तीचे स्फुल्लिंग तेजाने तळपू शकेल. बृहन्महाराष्ट्र मंडळ तुम्हा आम्हाला आश्वासक वाटावे असे एक मराठी शक्तीकेंद्र बनू शकेल. त्यासाठी अधिष्ठित जगन्नाथाचा पाठींबा लाभावा हीच मनोमन इच्छा!

बृहन्महाराष्ट्र मंडळ स्थापना, निकडीची संकल्पना
बलशाली मंडळ होवो, दृढ व्हावी ऐक्याची भावना!

**जयश्री हुपरीकर** (शिकागो)
संस्थापक, बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

### या अंकात ...

लेखनाचे आवाहन २
बृ. म. मंडळातर्फे काही निवेदने,
मराठी मंडळांतून फेरफटका ३
मातोश्री,
मायभूमीवरून फेरफटका ४
फिलाडेल्फिया अधिवेशन वृत्तांत ५–६
वॅलेंटाईन डे निमित्त:
कुठे थांबावं हे कळलेला माणूस ७
सेवाभावी संस्था – 'हालो' ८
तार जुळली.. १२ फेब्रुवारीच्या जन्मकुंडलीशी ९
शेवटचे पान १०

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्रमंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)

**संस्थापक**
कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

**संपादक:** विनता कुलकर्णी

**सहाय्यक संपादक:** वसुधा पटवर्धन

**संपादन-सल्लागार:** मोहन रानडे, लीना देवधरे

**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**
144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-215-354-1423 (EST)
E-mail: editorbmm@yahoo.com

बृहन्महाराष्ट्र वृत्त मुद्रक आणि वितरक : दिलीप नामजोशी
Sir Speedy Printing, Blue Bell, PA

**वर्गणीचे दर**

| Paper Copy | US | Canada | Other |
|---|---|---|---|
| वार्षिक: | $ 21 | $ 26 | $ 41 |
| द्वैवार्षिक: | $ 40 | $ 50 | $ 80 |
| आजीव: | $250 | $350 | $375 |

**Electronic copy : $10 /year**

**जाहिरातीचे दर**

| | US | Can |
|---|---|---|
| पूर्ण पान: | $155 | $220 |
| अर्धे पान: | $ 85 | $115 |
| पाव पान: | $ 50 | $ 70 |
| अष्टमांश पान: | $ 35 | $ 40 |

- वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक मंडळ सहमत असतेच असे नाही.
- लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादक मंडळाकडे राहतील
- पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल

**बृहन्महाराष्ट्रमंडळाची कार्यकारिणी (२००७-२००९)**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष:** | गिरीश ठकार, | पिट्सबर्ग, पेन्सिल्व्हेनिया |
| **कार्यवाह:** | संदीप देवकुळे, | सॅन होसे, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष:** | आशिष चौघुले, | होकेसिन, डेलावेअर |
| **सभासद:** | लीना देवधरे, | टोरांटो, कॅनडा |
| | रिटा फ्रेंचमन, | नॅशव्हिल, टेनेसी |
| | किरण जोगळेकर, | फिलाडेल्फिया |
| | ललित महाडेश्वर, | रॅले नॉर्थ कॅरोलायना |
| | किशोर पाठारे, | ओर्लॅंडो, फ्लोरिडा |

**माजी अध्यक्ष:** जगदीश वासुदेव, प्रिन्सटन, न्यू जर्सी

**सल्लागार:** श्री ठाणेदार, सेंट लुईस, विद्या हर्डीकर सप्रे, लॉस एंजेलिस, मोहन रानडे, फिलाडेल्फिया

**MAIYTRA: मैत्र प्रतिनिधी:** विशाल नायक, सॅन होसे

**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्रमंडळ, उत्तर अमेरिका
196, Bryna Lane, Carnegie, PA 15106
gsthakar@gmail.com www.bmmonline.org


# लेखनाचे आवाहन

बृहन्महाराष्ट्र वृत्ताच्या वाचकांमध्ये दडलेल्या लेखकांकडून पुढील काही अंकांसाठी खालील विषयांवर लेख / कविता (अर्थात मराठी भाषेत) मागवत आहोत.

**शब्द मर्यादा:** ६००

**लेखनासाठी विषय:**

- 'बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन असे असावे'
- 'स्मरण गंध' (nostalgic memories)
- 'मी अनुभवलेला एक संस्मरणीय दिवस'.

### अंकासाठी साहित्य पाठवण्याचा पत्ता:

**Email :**

vinata@gmail.com
**Or**
vasudhapatwardhan@yahoo.com

**For sending paper copy :**

Vinata Kulkarni
1489 Heritage Way # 23,
Oakville ON L6M 4M6 Canada

**Or**

Vasudha Patwardhan
4708, Touchstone ter
Fremont, CA, 94555





१४ ते ३५ वर्षाच्या तरुणांना
मराठी शिकण्यासाठी उत्तम साधन
**माय मराठी**
दोन सीडी आणि पुस्तकाचा संच
किंमत फक्त ३५ डॉलर्स
ऑर्डर करण्यास फोन करा :
215-354-1423


- ह्या वृत्तपत्रासाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष मदत करणाऱ्यांना धन्यवाद!
- वृत्तपत्राविषयी सूचना व अभिप्राय स्वागतार्ह !
- Camera-Ready/ PDF पृष्टे वगळता बाकी वृत्तपत्र काळजीपूर्वक 'proof read' करण्याचा संपादकांचा प्रयत्न असतो.

# बृ.म. मंडळातर्फे काही निवेदने

बृहन्महाराष्ट्र मंडळ हे उत्तर अमेरिकेतील समाजाचे आणि समाजासाठी आहे. मराठी समाजाच्या बदलत्या गरजांचा आणि वळणांचा विचार होण्यासाठी हवा आहे कार्यकारिणी आणि मराठी माणसांचा संवाद! यासाठी आम्ही मंडळाच्या कार्यप्रणालीची माहिती वेळोवेळी प्रसिध्द करण्याचे ठरवले आहे. वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया व सूचना जरूर कळवाव्यात.

–**विद्या हर्डीकर सप्रे** (सल्लागार समिती, बृ. म. मं.)
*vidyahardikar@hotmail.com*

### २०११ च्या अधिवेशनाचे निवेदन

२००९ चे फिलाडेल्फिया अधिवेशन तोंडावर आलेले असतांनाच २०११ च्या अधिवेशनासाठी आवेदने (applications) लौकरच घेतली जाणार आहेत. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षांकडून सर्व मराठी मंडळांना आवेदनाबद्दलची माहिती येत्या काही दिवसात पाठवली जाईल. त्यात पुढील गोष्टी असतील.

१. आवेदन कसे करावे याबद्दलची माहिती
२. निवड कशी होते याची रुपरेषा व माहिती
३. बृ.म.मंडळ व मराठी मंडळ यांच्यातील सामंजस्य करार(MOU)

उमेदवार मराठी मंडळाने करारावर सही करून आवेदनपत्रे ३० एप्रिल पर्यंत बृ. म. मंडळाच्या अध्यक्षांकडे पाठवायची आहेत. अधिक माहितीसाठी श्री गिरीश ठकार यांचेशी संपर्क साधावा.

### २००९ ते २०११ च्या कार्यकारिणीबद्दल निवेदन

जुलै २००९ च्या अधिवेशनात बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या नव्या कार्यकारिणीची निवडणूक होईल. ज्यांना नवीन कार्यकारिणीवर काम करण्याची इच्छा असेल त्यांनी नियमावली व आवेदनांसाठी बृ.म. मंडळाचे अध्यक्ष श्री गिरीश ठकार यांचेशी gsthakar@gmail.com ह्या ईमेलवर संपर्क साधावा.

टीप: बृ. म. मंडळाचे काम करण्यासाठी काही स्वयंसेवकही हवे आहेत.

### २००९ चे बृहन्महाराष्ट्र मंडळ पुरस्कार

विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या उत्तर अमेरिकेतील मराठी व्यक्तींना दर अधिवेशनात पुरस्कार दिले जातात. आपल्या गावातील कोणा व्यक्तीला असा सन्मान मिळणे उचित आहे असे वाटत असल्यास त्यांचे नाव, थोडक्यात माहिती व कार्यक्षेत्र यांचे तपशील gsthakar@gmail.com, vidyahardikar@gmail.com ह्या इमेल्स वर कळवावेत. म्हणजे नामांकन (nomination) कसे करावे याचे मार्गदर्शन आम्ही करू.

टीप: नामांकन मराठी मंडळांकडून अथवा बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीकडून यावे लागते.

# मराठी मंडळांतून फेरफटका

मकर संक्रांतीनिमित्त उत्तर अमेरिकेतील मराठी मंडळातून विविध कार्यक्रम आयोजित केले होते.

**अॅटलांटा** येथे प्रौढांसाठी ‘वळू’ आणि मुलांसाठी Marley and Me हे चित्रपट दाखवण्यात आले.

**सिनसिनाटी, इंडियाना आणि जॅकसनव्हिल** मंडळात हळदीकुंकु आणि इतर करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले होते.

**शिकागो** मंडळात वैशाली धांडे यांनी मुलांचा कार्यक्रम बसविला होता. द. मा. मिरासदार यांच्या कथाकथनाची व्हिडिओ दाखवण्यात आली.

**लॉस एंजेलिस** येथे लहान व मोठ्यांच्या नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या.

**टोरांटो** मंडळात १८ जानेवारीस पूर्व विभागात व ३१ जानेवारीस पश्चिम विभागात वनिता मंडळाने संक्रांतीचे हळदीकुंकु आणि इतर करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले होते. याचवेळी मंडळ सदस्यांना फिलाडेल्फिया अधिवेशन संयोजक समितीने भेट म्हणून पाठविलेले कालनिर्णय तसेच सर्वांना आगामी अधिवेशनास उपस्थित रहाण्याची विनंती व अधिवेशनासंबंधित माहितीपुस्तिका देण्यात आली.

**(ग्रेटर) वॉशिंग्टन** – मराठी कला मंडळात ज्योती कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली यावर्षाचे नवीन कार्यकारिणी समितीतील सर्व उत्साही सभासद उत्तमोत्तम कार्यक्रम द्यावयास तयार झाली आहेत.

वर्षाची सुरुवात विवेक बेडेकर, अस्मिता प्रधान, विनित देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केलेल्या ‘ताक् धिना धिन’ कार्यक्रमाने झाली. ह्या अंताक्षरी सारख्या कार्यक्रमाला लोकांनी भरपूर प्रतिसाद दिला. तिळगुळाच्या लाडवांनी झालेले स्वागत, तीन वर्षांच्या खालील मुलांसाठी आयोजित केलेले बोर नहाण आणि कार्यक्रमानंतर मंडळाने आयोजित केलेले गुळाच्या पोळीचे जेवण जेवून सर्व उपस्थित लोक तृप्त मनाने घरी गेली.

एकंदर वर्षाची सुरुवात दणक्यात झाली आहे. कार्यकारिणी समितीला आम्हा सर्व वॉशिंग्टन मराठी मंडळींतर्फे धन्यवाद व अनेक शुभेच्छा!

– **प्रतिनिधी**

### कॅनडा सरकारतर्फे कै. विमला ढवळे यांना आदरांजली

कॅनडाचे डेविड मॅक्गिंटी, मेंबर ऑफ पार्लमेंट (दक्षिण ऑटवा) हे एप्रिल २, २००९ रोजी पार्लमेंट हाऊस ऑफ कॉमन्स मधे सभासदांच्या उपस्थितीत कै. विमला ढवळे यांना आदरांजली वाहणार आहेत. कनेडीयन पार्लमेंटकडून अशा प्रकारे मानांकित होणाऱ्या कै.सौ विमला ढवळे ह्या पहिल्या इंडोकनेडियन महिला आहेत.

# मातोश्री

न मातुः परदैवतम्. माझी आई विमला सदाशिव ढवळे हिने वयाच्या ८८ व्या वर्षी संक्रांतीच्या दिवशी – जानेवारी १४,२००९ रोजी, ईहलोकाचा प्रवास संपवला.



आईचा जन्म वर्ध्याचा. शिक्षण पुण्याच्या हुजूरपागा शाळेत झाले. ती अत्यंत हुषार, तल्लख बुध्दीची होती. इंटर आर्टस् नंतर विवाह झाला. तीन मुलांचे आगमन झाले. त्यानंतर तिने संसाराच्या सर्व जबाबदाऱ्या संभाळून बी. ए. व संस्कृतमधे एम.ए. केले. शाळेत तिची मैत्रीण होती कवयत्री शांता शेळके. तर एम. ए. ला सहाध्यायी होते कवी वसंत बापट. आईला साहित्याची उत्तम जाण होती. संस्कृत, मराठी व इंग्रजीत उत्तम वक्तृत्व तसेच गीता, अथर्वशिर्ष, रामरक्षा, गीतरामायण मुखोद्‌गत होते. संभाषणचातुर्य, व सुभषितांचा अचूक वापर, निगर्वी स्वभाव व प्रसन्न व्यक्तिमत्व ह्यामुळे तिच्या विषयी सर्वांना आदर, आपुलकी व जिव्हाळा वाटत असे.

शिक्षणक्षेत्रात प्रवेश करण्याआधी तिने बी.एड.ची पदवीही मिळवली. तेव्हा लहाणपणापासून सतावत असलेल्या दम्याच्या व्याधीने उचल खाल्ली. आईने २ वर्षे योगविद्या व योगासने नियमितपणे करून त्यावर मात केली. योगासनांची व्याख्याने, प्रात्यक्षिके करून दाखविण्यासाठी श्रीलंका सरकारने तिला सन्मानपूर्वक बोलावले. तसेच भारतसेवक समाजातर्फे १ वर्षाची आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळवून हॉलंड, युरोपात प्रमुख देशात, अमेरिकेत आणि शेवटी जपान, हाँगकाँग, देशांमध्येही तिने धीटपणे व्याख्यानांसाठी दौरा पार पाडला. महाराष्ट्र सरकारने तिला जे.पी. (जस्टिस ऑफ पीस) या सन्मानाने गौरवले. सत्यसाईबाबा, स्वामीनारायण संप्रदायाचे प्रमुख दयानंद सरस्वती, महर्षी महेश योगी यांनी तिला व्यक्तिगत शाबासकी दिली.

निवृतीनंतर ती व माझे वडील १९७८ साली कॅनडात कायम वास्तव्यासाठी आले. आईने कॉलेजात जाऊन नर्सिंगचा अभ्यासक्रम पूर्ण केला व २ तपे नोकरी केली. दम्याने त्रस्त असलेल्या सुमारे १२५ लोकांना पूर्णपणे व्याधीमुक्त करून त्यांचे दुवे घेतले. जेष्ठ नागरिकांसाठी १२ वर्षे तीन ठिकाणी वर्ग चालवले. तिच्या या अजोड कामगिरीबद्दल कॅनडाचे माजी पंतप्रधान क्रेचियाँ व मऱ्होनी यांनी गौरवपर पत्रे पाठवली. इंडिया कॅनडा असोशियनने तिचा सत्कार केला. २४ जून २००८ रोजी एअर कॅनडाने २०० वे विमान घेण्याचे ठरवले तेव्हा बोईंगच्या सिॲटल कारखान्यात भव्य सोहोळा झाला. आई मुख्य अतिथी असल्याने तिच्या हस्ते रिबीन कापण्याचा समारंभ झाला. तेव्हा तिने अस्खलित इंग्रजीत भाषण करून सर्वांमुखी वाहवा मिळवली.

तिच्या संभाषणात नेहेमी विनोदाचा हलका शिडकावा असे. 'कामावे ते सामावे' हे तिचे जीवनसूत्र होते. आपल्या मिळकतीचा १०% किमान हिस्सा ती दान करत असे. भारी कपडे, दागिने यांचा तिला मुळीच शौक नव्हता. "कोणी तुमच्या साठी कणभर काम केले तर त्याच्या साठी मणभर काम करावे" असा तिचा उपदेश होता. दरवर्षी ती भारत भेटीस जात असे. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या बरोबर तिच्या मनाच्या तारा जुळल्या होत्या. दोघींनी जोडीने नाटके पाहिली, समारंभांना उपस्थित राहिल्या. मराठी भाषा, मराठी माणूस याबद्दल आईला कमालीचा आदर होता. योगावर तिने तीन पुस्तके लिहीली. वयाच्या ८७व्या वर्षी पी.एच्.डी. करण्यासाठी तिने पुस्तकांची जुळवाजुळव केली होती.

धर्म रंग, वंश, भाषा याबाबत आईने कधी भेदभाव केला नाही. म्हणूनच तिच्या अंतीम आजाराच्या वेळी मंदीर, चर्च, गुरुद्वारा, सिनेगॉग येथे प्रार्थना झाल्या. इस्त्राईलींच्या जमातखाना या मसजीदीतही दुवा मागण्यात आला. माझ्या वडिलांप्रमाणेच आईनेही मरणोत्तर देहदान केले. कृतज्ञता हा आईचा स्थायीभाव होता. असे बहुआयामी व्यक्तीमत्व सर्व परिचितांच्या मनाला चटका लावून काळाच्या पडद्याआड गेले आहे.

**विजय ढवळे, ऑटवा, कॅनडा**

## मायभूमीवरून फेरफटका



# फिलाडेल्फिया अधिवेशनाच्या रजिस्ट्रेशनला अभूतपूर्व प्रतिसाद ! मंदी नमली मराठीबाण्या पुढे !!



*श्री. उद्धव ठाकरे यांना फिलाडेल्फिया अधिवेशनाचे निमंत्रण देतांना, श्री बाळासाहेब ठाकरे यांना सुद्धा संक्रांतीच्या शुभेच्छा अधिवेशनाच्या कार्यकर्त्यांनी दिल्यात. माय मराठीसाठी उत्तर अमेरिकेत सुरू असलेल्या सर्वांच्या कार्याचे बाळासाहेबांनी तोंड भरून कौतुक केले. यंदाच्या अधिवेशनामध्ये, सॅटेलाईट द्वारे त्यांच्या संदेशाचे थेट प्रक्षेपण करण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत.*



*अधिवेशनाचे निमंत्रण व संक्रांतीच्या शुभेच्छा मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांना देतांना, अधिवेशनाचे संयोजक मुकुंद कुटे व मंडळ समन्वयक किरण जोगळेकर.*

## रजिस्ट्रेशनला अभूतपूर्व प्रतिसाद ! पुढच्या १००० जागा १५ दिवसात संपल्या !!! मंदी नमली मराठीबाण्या पुढे !!

अमेरिकेतील सर्व मराठी बांधव अधिवेशनाला भरभरून प्रतिसाद देत आहेत. अर्लीबर्ड म्हणून विनाअधिभार दिलेल्या पुढच्या १००० आरक्षित जागा पहिल्या १५ दिवसामध्येच भरल्या गेल्या. त्यानंतर देखील नोंदणी झालेल्या ५०० जागांपैकी ३०० जागा या २५ डॉलर्स जादा भरून घेतल्या गेल्या. आता पर्यंत केवळ ३८ दिवसांत, देणगीदार वगळून १५१९ व देणगीदार धरून अंदाजे २१०० जागांची नोंदणी झाली आहे. २० महिने कार्यकर्त्यांनी केलेल्या मेहनतीला व निवडलेल्या उत्तम कार्यक्रमांना आपण सर्वांनी दिलेली ही पसंतीची पावतीच आहे.

आर्थिक मंदीमुळे किंवा रसिकांच्या नाराजी मुळे एकीकडे जेंव्हा 'विश्व' म्हणून घेणाऱ्या काही संमेलनांना अवघे १००० प्रेक्षक सुद्धा न मिळाल्याने आवरते घेण्यास भाग पडत आहे, त्या पार्श्वभूमीवर फिलाडेल्फिया अधिवेशनाला आपण देत असलेला हा भरघोस प्रतिसाद व प्रेम पाहून सर्व फिलाडेल्फियाकर भारावून गेले आहेत. कार्यकर्ते म्हटले की नकळत होणाऱ्या थोड्या बहूत चूका व तांत्रिक गडबडी या आल्याच. मात्र कार्यकर्त्यांच्या निरपेक्ष कामाकडे बघून, ज्या आपुलकीने सर्व मराठी मंडळी आम्हाला चुकांची दुरूस्ती करण्यास वेळ देत आहेत व त्याच प्रमाणे मदत करण्यास पुढे येत आहेत त्या बद्दल तुम्हा सर्वांची करावी तितकी प्रशंसा कमीच पडेल. या प्रेमामुळे, आपल्या सर्वांच्या व्यवस्थेत काही कमी राहू नये या साठी, सर्व कार्यकर्ते प्रयत्नांची पराकाष्ठा करतील असा विश्वास बाळगा.

नोंदणीचा वेग असाच कायम राहू द्या. ५००० नोंदणीं संपण्याच्या आधी त्वरीत रजिस्ट्रेशन करून निराशा टाळा. दुसऱ्या पिढीतील तरूणांच्या १० ते १२ कार्यक्रमांना या आठवड्यातच मंजुरी दिल्या गेली. त्यासंबंधी अधिक माहिती या महिन्याच्या शेवटी मिळायला लागेल. www.2009Philadelphia.org

## क्रेडिट कार्ड सुविधा महिन्या अखेरीस पुन्हा सुरू

क्रेडिट कार्ड सुविधा परत एकदा या महिन्या अखेरीस सुरू होत आहे. अमेरिकेतील मंडळींकरिता "पे बाय चेक" सुविधा उत्तम रित्या काम करत आहे. मात्र कायदेशीर अडचणींमुळे ही सुविधा कॅनडामधील रसिकांसाठी उपलब्ध नाही; त्या सर्वांच्या होत असलेल्या गैरसोई बद्दल आम्ही क्षमा मागतो. तो पर्यंत कॅनडावासीयांनी बृममं वृत्तामध्ये प्रकाशित झालेला फॉर्म भरून व जवळच्या बँकेमधून अमेरिकन डॉलर्सचा चेक काढून आम्हाला पाठविल्यास त्यांची नोंदणी तातडीने करण्याची व्यवस्था देखील आम्ही केली आहे.


## देणगीदारांनी देखील रजिस्ट्रेशन करावे

३१ डिसेंबर आधी जे सभासद देणगीदार झालेत त्यांच्या जागा आरक्षित आहेतच. अशा सर्व देणगीदारांना निधी संकलन समितीतर्फे देणगीक्रमांक देखील कळविण्यात आला आहे. अशा सर्व देणगीदारांनी देखील अधिवेशनाच्या संकेत स्थळावर जाऊन नोंदणी करणे अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे तुम्हाला बिझिनेस कॉन्फरन्स, सिएमई वगैरेंची, आशाताईंच्या २ जुलैच्या हिंदी कार्य क्रमाची, बँक्वेटची आणि तुमच्या घरातील इतरही सदस्यांची नोंदणी करता येईल. आता पर्यंत अंदाजे ६०० देणगीदारांपैकी केवळ २०० देणगीदारांनीच अशी नोदणी केली आहे. या प्रक्रियेमध्ये काही अडचण आल्यास आपणाला सर्वतोपरीने मदत करण्यास निधी संकलन समितीचे प्रमूख श्री. जगदीश वासुदेव (फोनः ६०९ ३३२ ०३९७) उपलब्ध आहेत.

## बऱ्याच हॉटेल रूम्स आता उपलब्ध !!

कोर्टयार्ड, डबलट्री, कंफर्ट इन व लोज हॉटेलमध्ये जुलै २,३,४ साठी अनुक्रमाने अंदाजे ५०, १७५, ५०, ३५ रूम्स उपलब्ध आहेत. त्याशिवाय, या महिन्या अखेरीस अजून १०० रूम्स करार बद्ध करण्याचा प्रयास सुरू आहे. त्यामुळे सर्वांनी ताबडतोब ऑनलाइन रजिस्ट्रेशन करून या हॉटेल रूम्स बुक कराव्यात व निराशा टाळावी ही विनंती आहे. सपर्कः hotels@bmm2009philadelphia.org

# फिलाडेल्फिया अधिवेशनाच्या बातम्या




*बृममं अधिवेशनांच्या इतिहासामध्ये प्रथमच २०,००० कुटूंबांना अधिवेशन कार्यक्रम पत्रिका पाठविण्यात आली. या उपक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.*

## 'विश्व गौरव' पुरस्कारामुळे आशाताईंच्या हिंदी कार्यक्रमाला देखील प्रचंड प्रतिसाद !

या वर्षीच्या फिलाडेल्फिया अधिवेशनाचं वेगळेपण म्हणून आशाताई साठी मुंबईमध्ये पत्रकार परिषदेमध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाने घोषीत केलेल्या 'विश्वगौरव' पुरस्काराचे सर्वत्र स्वागत झाले. पंच्चाहत्तरीमध्ये देखील त्यांचा उसळत असलेला उत्साह, चैतन्य व त्यांनी मुक्तकंठाने अमेरिकेतील नवीन सांस्कृतिक चळवळीची केलेली प्रशंसा, तेथे व येथे सर्वांनाच भावली आहे. त्यांच्या हिंदी गीतांच्या कार्यक्रमातील १२०० जागांपैकी ६०० जागा आताच संपल्या आहेत. तेव्हा त्वरा करा व आपल्यातीलच या महान गायिकेचा अमेरिकेतील एकमेव हिंदी कार्यक्रम चुकवू नका.

## २ जुलैसाठी हॉटेल्स आता उपलब्ध !!

हिल्टन, कोर्टयार्ड व लोज हॉटेलच्या रूम रिझर्व्हेशन सिस्टीम मधील गडबडीमुळे सवलतीच्या दरातील रूम्स काही जणांना केवळ ३ व ४ जुलैसाठीच बुक करता आल्यात. आता मात्र या तिन्ही हॉटेल्स मध्ये २ जुलैसाठी जागा उपलब्ध झाल्या आहेत. ज्या कोणाला ३ व ४ जुलैला जोडून, आता २ जुलैला देखील रूम्स हव्यात, त्यांनी कृपया आपापल्या हॉटेल्सशी परत संपर्क करावा.

## चुकीची दुरूस्ती

पोस्टाने पाठविलेल्या ३२ पानी छापील कार्यक्रम पत्रिकेमध्ये नजर चुकीने श्री. शौनक अभिषेकी, राहूल देशपांडे व रघुनंदन पणशीकर यांच्या एकत्र कार्यक्रमाच्या ऐवजी श्री. उपेन्द्र भट, शौनकअभिषेकी, राहूल देशपांडे यांच्या 'संगीत त्रिवेणी' या कार्यक्रमाची घोषणा झाली त्याबद्दल आम्ही क्षमाप्रार्थी आहोत. लवकरच या चुकीची दुरूस्ती वेबसाईटवरील कार्यक्रम पत्रिकेमध्ये केली जाईल. क्षमस्व.

## नवीन कार्यक्रमांवर एक नजर !!

* आदिती भागवत यांचा फ्युजन लावणीचा दिलखेचक कार्यक्रम करारबद्ध झाला..* चित्रपट महोत्सवाला २ नवीन चित्रपटांच्या प्रवेशिका आल्या...* चित्रपट महोत्सवाला ७ नवीन चित्रपटांच्या प्रवेशिका या महिन्यात अपेक्षित..* कथ्थक गुरू अर्चना जोगळेकरांचा भव्य कार्यक्रम करारबद्धतेच्या मार्गावर..* डॉ. आनंदीबाई जोशींच्या गौरवशाली जीवनावर आधारित लघुनाटक येतय..* भारतरत्न स्वरभास्कर भिमसेनजींवर 'गुरूवंदना' कार्य क्रमाची चाचपणी सुरू..* उत्तर अमेरिकेतील कलाकारांचा मराठी स्टॅण्डअप कॉमेडी संच करारबद्ध..* उत्तर अमेरिकेतील अधिक दोन तीन कार्यक्रम विचाराधीन...

## ट्रेड फेअर मधील स्टॉल्सच्या किंमतीत घट अपेक्षित!

अधिवेशनाला लागणाऱ्या भाड्याच्या सर्व सामानासाठी, डेकोरेटर सोबतच्या करारावर वाटाघाटी सरू आहेत. मंदीच्या पार्श्वभूमीवर ट्रेड फेअर मधील स्टॉल्सच्या किंमतीत निकराची घासाघीस होऊन मार्चच्या अखेर पर्यंत त्यांचे भाव कमी होण्याची शक्यता आहे. मात्र सर्व स्टॉल्स इच्छुकांनी आपल्याला हव्या त्या मोक्याच्या जागेवरचा स्टॉल, मार्चपर्यंत वाट न बघता ताबडतोब बूक करावा अशी सूचना आहे. मार्च अखेरीस झालेली भावातील घट, आधी बूक झालेल्या व नंतरच्या अशा सर्व स्टॉल्सना लागू होईल याची नोंद घ्यावी.

## बिझीनेस कॉन्फरन्सला दिग्गजांची उपस्थिती !

या वर्षीच्या फिलाडेल्फिया अधिवेशनामधील बिझीनेस कॉन्फरन्सला दिग्गजांची उपस्थिती लाभणार आहे. किर्लोस्कर ब्रदर्सचे चेअरमन श्री. संजय किर्लोस्कर प्रमूख पाहुणे म्हणून तर आयआरबी इन्फ्रा स्ट्रक्चर डेव्हलपर्सचे चेअरमन श्री दत्तात्रय म्हैसकर प्रमूख वक्ते म्हणून येण्याचे नक्की झाले आहे. त्याच बरोबर निर्मल मुळे, रॉन सॉमर्स यांसारखे अमेरिकेमधील व भारतातील २० ते २५ यशस्वी सीईओ व गुंतवणूकदार सुद्धा सहभागी होतील. टाय न्यूजर्सी, यूस इंडिया बिझिनेस फोरम, बृहन्महाराष्ट्र मंडळाचा नवीन उपक्रम 'नेम', अनेक चेंबर्स ऑफ कॉमर्स अशा नावाजलेल्या भागीदार संस्थांच्या सहभागामुळे यंदाची कॉन्फरन्स गाजणार आहे. नवीन उभ्या राहू पाहणाऱ्या कंपन्यांना मार्गदर्शन, त्याच बरोबर यशस्वी उद्योगांपासून प्रेरणा व नेटवर्किंग असा सर्वजयी कार्यक्रम आम्ही आखला आहे. विस्तृत माहिती लवकरच अधिवेशनाच्या वेबसाईट वर मिळेल. तेव्हा त्वरा करा व लवकर नोंदणी करून तुमच्यातील उद्योजकाला एक चान्स द्या.

# कुठे थांबावं हे कळलेला माणूस!

माझ्या कपाळावर बहुतेक सावधान! धोक्याचे वळण! असं काहीतरी लिहीलेलं असावं. आरशात कधी ते मला दिसलेलं नाही. पण सर्व पोरींना ते सहज दिसत असावं (सुदैवाने एकीचा स्वभाव धाडसी निघाला हे एका अर्थानं बरंच झालं! ) त्यामुळे माझ्या मागे कोणतीही पोरगी हात धुवून पाठीस लागली नाही. वयाच्या सतराव्या वर्षी शाळेच्या मैदानावर एकटं गाठून, नको! नको! म्हणत असतांना सुध्दा माझ्यावर चुंबनांचा वर्षाव करून कोणी माझा चेहेरा लिपस्टिकने रंगवला नाही. (त्या वयात कुणाच्या तरी चपलेनं कुणाचं तरी थोबाड रंगवल्याच्या कथा अधून मधून ऐकू यायच्या. त्यामुळे त्या भानगडीत पडायचं धाडसच झालं नाही.) शिक्षणानिमित्त मी परगावी जाण्यासाठी गाडीमध्ये चढत असताना स्वत:च्या चंदेरी साडीचा घोळ एका हाताने सावरत, दुसऱ्या हाताने खिडकीच्या गजांना धरून व्याकूळ स्वरात ‘मलाही घेऊन जा! मलाही यायचंय रे तुझ्या बरोबर!’ असं कोणीही सुंदरी स्फुंदत स्फुंदत म्हणाली नाही. ह्या कविकल्पना नाहीत. असे भाग्यवान पुरूष प्रत्यक्षात असतात. नाटककार गोविंद बल्लाळ देवलांनाही असे पुरूष दिसले होते. म्हणूनच ते लिहून गेले–

तेचि पुरूष दैवाचे ! धन्य धन्य जगिं साचे ॥
अंगे भिजली जलधारांनी । ऐशा ललना स्वयें येउनी
देती आलिंगन ज्या धांवुनि । थोर भाग्य त्यांचे ॥

पण त्यांचं स्वत:चं नशीबही ह्याबाबतीत थोडसं माझ्यासारखंच असावं. कारण ह्या अजोड पदाच्या ओळी एकीकडे लिहीत असतांना दुसरीकडे त्यांची पत्नी वैतागून त्यांना म्हणाली:

अजुनि खुळा हा नाद पुरेसा कैसा होइना !
नाटक झाले जन्माचे मनि कां हो येइना?

पण देवलांच्या वर्णनाप्रमाणे भाग्यवान पुरूष माझ्याही पाहण्यात आला आहे. एका विमान प्रवासात हवाई सुंदरी इकडून तिकडे जात असतांना तिचं त्याच्याकडे लक्ष गेलं. त्याला ओलांडून ती पलिकडे गेली होती. पण ती थबकली. मागे वळली. परत एकदा त्याच्याकडे तिनं बघितलं. आणि तिच्या खास ठेवणीतल्या मधाळ स्वरात त्याला अजून एक ड्रिंक हवं आहे का हे विचारलं. काळ थांबला होता. श्वास रोखले होते. प्रश्न फक्त त्याच्या एकट्या साठीच होता. तो नजर वर उचलतो. तिच्या डोळ्यात डोळे मिसळतो. आणि गोड हसत एकच शब्द उच्चारतो–‘नंतर!’ दोघांनाही एकमेकांच्या बोलण्यातले गर्भितार्थ कळले आहेत. काही वेळाने बाकीच्या प्रवाशांना खाऊ पिऊ घालून, दिवे मालवून निजानीज होते. त्यावेळी तो त्याच्या शेजारी असलेल्या रिकाम्या खुर्चीतली न वापरलेली शाल आणि उशी काढून ती खुर्ची मोकळी करतो. त्याच्या अंदाजाप्रमाणे ती ललना स्वये येउनी त्या खुर्चीत बसते! आणि–जाऊ द्या! कशाला उगाच तपशीलात शिरा. पण अशा वेळी मात्र मला माझ्या नशिबाशी भांडावसं वाटतं. आमच्या शेजारी रिकामी खुर्ची? बात सोडा! बहुतेक वेळी दीड खुर्चीचा ऐवज असलेला एखादा जाड्या शेजारी धाडकन् येऊन बसतो. खुर्चीच्या हातावर हात अन् पाठीवर पाठ टेकायच्या अधिकारावर पाणी सोडावं लागतं. जमेल तेव्हढं अंग चोरून बसावं लागतं. आणि माझ्याकडे दोनदा बघून ड्रिंक विचारणाऱ्या हवाई सुंदऱ्या? त्यांना खरं तर एकदाही माझ्याकडे बघावसं वाटत नसूनही त्यांच्या नोकरीचा भाग म्हणून एकदा तरी बघावं लागतं. मग त्यावेळी मारक्या म्हशीसारखं बघत मनातल्या मनात ‘पी मेल्या’ किंवा तत्सम काहीतरी बडबडत अर्धा ग्लास टोमेटो ज्यूस देऊन त्या पुढे सटकतात. आणि कहर म्हणजे बऱ्याच वेळा तर माझ्या वाट्याला हवाईसुंदरच येतात! अहो नशीबाशी कुठे कुठे भांडणार? वर नशीब खदखदून हसत म्हणतं, ‘लेका! एक बायको मिळाली आहे ते महत्‌भाग्य समज! म्हणे ‘मलाही गप्पा मारायला प्रेमळ हवाईसुंदऱ्या हव्यात!’ असो. वर वर्णिलेल्या ह्या गृहस्थाचं नशीब फक्त प्रेमळ हवाईसुंदरीवरच थांबत नाही. नर्स, वेट्रेस, कुणाचीतरी सेक्रेटरी, लोकल ट्रेनमधे अवतरलेली परी–कोणीही असो, त्या नेमक्या ह्याच्याच शेजारी बसणार, ह्याच्याबरोबर कॉफी प्यायला जाणार! आणि संध्याकाळी.... पुढचा तपशील तुमचा तुम्हीच भरा.

ज्या व्यक्तीच्या आयुष्याच्या कोवळ्या विसाव्या वर्षापर्यंतच त्याला असे अनुभव आले आणि तरीही जो अत्यंत लाजरा बुजरा होता, आमच्या सारखाच आवडत्या पोरीकडे (धाडस न झाल्यामुळे) सरळ न बघता चोरून बघायचा, तिनं हॅलो! म्हटलं की उत्तराचे सगळे शब्द घशात अडकून बसायचे असा माणूस पुढच्या आयुष्यात हे बुजरेपणाचं ओझं झुगारून देऊन फुलपाखरासारखा स्वच्छंदी जीवन जगला, अजूनही जगतो आहे. आणि त्याने तसंच जगत रहावं. आयुष्यात एकदातरी ‘मनातल्या मनात’ प्रेम केलेलं असेल अशा सर्व तरुण–तरूणींना दीपस्तंभासारखं मार्गदर्शन करायला, तारुण्याचे पंख लावून रंगीबेरंगी स्वप्नांचा पाठपुरावा करायची स्फूर्ती द्यायला त्याने अमर व्हायला हवं. किंबहुना तो अमर झालेलाच आहे. त्याच्या कोट्यावधी चाहत्यांच्या हृदयात त्याची जागा अढळ आहे. अजूनही चौदा– सोळा वर्षांच्या पोरी त्याच्यापुढे हात करून त्याच्यावर सही मागतात आणि तोही त्या खट्याळ पोरींच्या हातावर बोटाने सही करून त्यांना लाजवतो. त्या पोरींच्या चाळीशीतल्या आया त्याला बघताच सोळा वर्षांच्या पोरींसारख्या बिथरतात. आणि साठीच्या आज्यांच्या गालावर स्त्रीसुलभ लज्जेनं रक्तीमा पसरतो. त्याचा चेहेराच तसा दैवी आहे. ह्या माणसाने भूतकाळ आणि भविष्य–काळाची जोखडं केव्हाच भिरकावून दिली आहेत. त्याला महत्वाकांक्षेच्या मशाली पाजळायच्या नाहीत. वयानं, ज्ञानानं, अनुभवानं परिपक्व व्हायचं नाही. भविष्यकाळासाठी उद्दीष्टांची उतरंड रचायची नाही. तो फक्त वर्तमानातच वावरतो. सौंदर्याचे क्षण, नवनिर्मितीचे क्षण, प्रेमात पडायचे क्षण, गाणं गुणगुणायचे क्षण, स्वप्नात झुलायचे क्षण– अशा रसरशीत वर्तमानात थांबावं कसं हे त्याला पुरतं कळलं आहे. म्हणून तो नुसताच अमर नाही तर चिरतरूणही आहे. जीवनातल्या अटळ विवंचनांवर त्याच्याकडे

एकच मंत्र आहे: 'हर फिक्र को धुऐं मे उडाता चला गया!' आणि सोबतीला मनात रुणझुणणारं गाणं आहे:
'गाता रहे मेरा दिल, तूही मेरी मंझील!' ही मंझील कोणत्याही एका व्यक्तीची, एका ऐश्वर्याची, सत्तेची, ज्ञानाची वा किर्तीची नाही. ही मंझील आहे जगण्याची. जगण्यावरच्या प्रेमाची. प्रेमाच्या गाण्याची. अमृताचे कुंभ देण्याची आणि घेण्याची! हे अमृत मनसोक्त पिऊन धुंद होण्याची. आणि खुळे लोक शतकानुशतकं अमरत्व देणारं हे अमृत जगभर शोधत आहेत. पण ते त्यांच्याकडेच आहे! ह्याला मात्र हृदयाच्या कुपीत वाहणारा तो प्रेमामृताचा झरा केव्हाच सापडला आहे. त्याचा शोध संपला आहे. आणि म्हणूनच तो त्याच्यापुढे गेला नाही. कुठे थांबायचं हे त्याला पूर्णपणे कळलं आहे. त्याअखंड यौवनाच्या झाडाचं नाव आहे– देव आनंद! माझ्या सारख्या असंख्य रसिकांनी आपलं तारुण्य आणि रंगीबेरंगी स्वप्नं त्याच्याकडे ठेवायला दिली आहेत. आणि तो देव जोपर्यंत माझ्या मनात आहे तो पर्यंत त्या ठेवी सुरक्षित आहेत. आणि तोपर्यंत – विरक्ती? छे! अनुरक्ती!

भक्ती– प्रेमभक्त मी–

अजून यौवनात मी..अजून यौवनात मी !

**डॉ. प्रियदर्शन मनोहर** (पिट्सबर्ग, पेन्सिल्व्हेनिया)

*(suggested reading: Romancing with Life: an autobiography, Dev Anand, Penguin, 2007)*

# सेवाभावी संस्था - 'हालो'

भारतात अनेक सुशिक्षित मंडळी विविध क्षेत्रात व संस्थांद्वारे समाजकार्यातून सामान्य जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठी सतत कार्यरत आहेत. अशाच एका जोडप्याला भेटण्याची संधी मला १४ डिसेंबरला लाभली. त्यांचे नाव आहे डॉ. शशिकांत अहंकारी व डॉ. सौ. शुभांगी अहंकारी. नांवात काय आहे ह्याचे ही दोघे उत्तम उदाहरण आहेत. नांव अहंकारी असले तरी ते निस्पृहपणे गेली २७ वर्षे मराठवाड्यातील खेड्यांत समाजकार्य करीत आहेत.

१९८० साली कांही तरुण डॉक्टर मंडळींनी मराठवाड्यातील खेड्यात काम करायला सुरुवात केली. तसेच वैद्यकीय क्षेत्रात सामाजिक जाणीवा निर्माण करणे ह्या उद्देशाने पुढे Health and Auto Learning Organization ची NGO म्हणून स्थापना झाली. वैज्ञानिक दृष्टिकोन असलेला निरोगी, स्वावलंबी व अन्यायमुक्त समाज तयार करणे असे ह्या संस्थेचे ध्येय आहे. ह्या करिता संस्थेने अनेक कायमस्वरूपी उपक्रम केले आहेत. खेड्यातील निवडक स्त्रियांना आरोग्य व शुश्रुषा संबंधी ५० दिवसांचे प्रशिक्षण देण्यासाठी 'भारतवैद्य', स्त्रियांवरील हिंसाचार रोखण्यासाठी 'सावली केंद्र', आर्थिक बचत करण्यासाठी 'संजीवनी महिला बचत केंद्र', किशोरवयीन मुलींकरता 'किशोरी प्रशिक्षण', परिसरातील ३० विद्यार्थांना वैज्ञानिक प्रयोग करण्यासाठी 'ग्रामीण विज्ञान केंद्र', शेतीची उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी १० गुंठे शेतीचा प्रकल्प, नवजात बालक व माता यांच्या आरोग्यासाठी, सोलापूर शहरासाठी ८० वस्त्यांसाठी 'शुअर स्टार्ट प्रकल्प' हे व असे एकंदर १४ उपक्रम 'हालो' चालवीत आहे. मराठवाड्यातील ७० गावांतील रहिवाश्यांचे सर्वांगीण आरोग्य संवर्धन करण्यात संस्थेने खूप प्रगती केली आहे. ह्या गावातील लोकसंख्यावाढ प्रतिवर्षी १.२ टक्के तर भारताची १.९ टक्के आहे. 'हालो' च्या कार्याचा भर स्त्रियांवर जास्त आहे. त्यांच्यामते घरातली स्त्री जर सुधारली, स्वतंत्र मताची झाली तर कुटुंबाची व पर्यायाने गांवाची सुधारणा करणे सुलभ होते.

१ सप्टेंबर २००७ रोजी संस्थेने सोलापूरपासून ५० किलोमीटर दूर असलेल्या अणदूर गावी जानकी रुग्णालय सुरू केले. या रुग्णालयात किरकोळ आजारापासून ते गंभीर रुग्णापर्यंत सर्व प्रकारच्या अद्ययावत सेवा उपलब्ध आहेत. 'भारत वैद्य' कार्यकर्त्या व सहाय्य समितीतर्फे हे रुग्णालय चालविले जात आहे. इथे out patient consultation व इतर उपचार माफक दरात उपलब्ध आहेत. ह्याखेरीज आतापर्यंत ७० गावात 'भारत वैद्य' कार्यकर्त्या प्राथमिक आरोग्यसेवा करीत आहेत.

'हालो मेडिकल फाऊंडेशन' सतत नवीन उपक्रम करीत असते. गावातील, खेड्यातील मुलींसाठी Nursing College लवकरच सुरू करण्याची संस्थेची योजना आहे. आपल्या सारखी परदेशांत स्थायिक झालेली मंडळी संस्थेला प्रामुख्याने दोन प्रकारे मदत करू शकतात, एक आर्थिक, आणि दुसरी श्रमिक. संस्थेकडे अमेरिका, जर्मनी, इंग्लंड अशा देशातील युवक–युवती काम करण्यास आतापर्यंत आलेली आहेत. कु. मेघना लिमये, न्यू जर्सी, ही युवती सध्या अणदूरला स्वयंसेविका म्हणून अमेरिकेतील Indicorp या संस्थेतर्फे काम करीत आहे. तिला पुढे डॉक्टर व्हायचे आहे. मला वाटते इथे जन्मलेल्या नवीन भारतीय पिढीला भारतात जाऊन काम करण्याची उत्तम संधी ही संस्था उपलब्ध करून देत आहे.

महाराष्ट्र फाऊंडेशन संस्थेने 'हालो' ला आर्थिक मदत केली आहे. ज्यांना आर्थिक मदत करायची असेल ते महाराष्ट्र फाउंडेशन तर्फे करू शकतात. (अलिकडेच न्यू जर्सी मधील अंजली आणि प्रदीप लिमये ह्यांच्या निवासस्थानी १४ डिसेंबरच्या सभेत जमलेल्यांच्या मदतीने आणि त्यांच्या कार्यालयीन सहकार्यांच्या आर्थिक मदतीने त्यांनी $8,883 "हालो" साठी एकत्र केले.) 'हालो' बद्दल अधिक माहितीसाठी संपर्क: डॉ शशिकांत अहंकारी,
*shashikant.hmf@gmail.com*
*Website: www.halomedicalfoundation*.org

**मुकुंद सातवळेकर,** न्यूजर्सी


## Bermuda Cruise

**(Post BMM Convention)**
**July 5-12, 2009**
**Price as low as $914/pp double**
**(optional CME cat I credit 8 hrs for physicians for $265.00)**
**Deposit of $250/pp due NOW**
**Final payment due April 1, 2009**
**For Details**
**Call Dr. Mohan Durve**
**451-5533 or 888-794-1995**

# तार जुळली..१२ फेब्रुवारीच्या जन्मकुंडलीशी


" You might belong in Gryffindor,
Where dwell the brave at heart,
Their daring, nerve, and chivalry
Set Gryffindors apart;
You might belong in Hufflepuff,
Where they are just and loyal,
Those patient Hufflepuffs are true
And unafraid of toil;
Or yet in wise old Ravenclaw,
If you've a ready mind,
Where those of wit and learning,
will always find their kind;
Or perhaps in Slytherin
You'll make your real friends,
Those cunning folk use any means
To achieve their ends…"

दिसेल तो पदार्थ खाऊन फस्त करणाऱ्या भस्म्यारोगाबद्दल लहानपणी एक गोष्ट ऐकली होती.. तसेच समोर जे दिसेल ते वाचायचे ह्या चश्म्यारोगामुळे घरी मुलांसाठी आणलेले J.K. Rowling लिखित हॅरी पॉटर पुस्तकांचे सर्व भाग पूर्वी मी वाचून काढले होते. त्यातल्या पहिल्या भागात वर उद्‌धृत केलेल्या चार – चार ओळींमधे एक 'सॉर्टिंग हॅट' प्रत्येकाची गुणवैशिष्ट्ये नोंदवून Gryffindor, Hufflepuff, Ravenclaw, Slytherin अशा चार घरात विद्यार्थ्यांची विभागणी करते. त्या गुणमापक 'सॉर्टिंग हॅट'चे स्मरण होण्याचे कारण, नुकतेच एका इंग्रजी वृत्तपत्रातील लेखाच्या शीर्षकाने आणि त्यासोबतच्या चित्राने माझे लक्ष वेधले. चित्र होते Stove pipe Hat व Darwin Hat चे. आणि लेखाचे शीर्षक होते 'Connections Separated at birth.' तुमची जन्म तारीख १२ फेब्रुवारी आहे? असल्यास तुमचेही connection ह्या दोन हॅट धारकांशी असून तुमच्या जन्म कुंडलीत जागतीक किर्तीचा योग– संभाव्य आहे. संभाव्य हा शब्द भविष्यवेत्त्यांमधे भलताच प्रीय आहे. कारण संभाव्यतेमधे ठाम उत्तर नसल्यामुळे,

चूक भूल देणे घेणे!.. भविष्यनिदान चुकले तर .. तुमचे कर्म जाणे! असे म्हणून नामानिराळे होता येते. बृ. म. वृत्तपत्राने 'राशी भविष्य' सदर सुरू केले अशी शंका आली ना? पण उत्तर अमेरिकेतील सुमारे ४५ महाराष्ट्र मंडळे आणि त्यातील तमाम मंडळींच्या बहुगुणसंपन्न बहुढंगी, बहुरंगी भविष्याचा वेध केवळ १२ राशीमंडळात आणि बृ. म. मंडळाच्या केवळ १२ पानी *ब्लॅक अँड व्हाईट* मासिक वृत्तपत्रात सामावणे आमच्या आवाक्याबाहेर आहे. बाकी दररोज अनेक वृत्तपत्रातून भविष्यवाणी प्रकट होत असतेच. 'हितशत्रूपासून सावध' 'नवे मित्र भेटतील', व्यवसायात जपून निर्णय घ्या', 'व्यवसायात उत्तम संधी', 'आरोग्यास धोका', 'उत्तम तब्येत राहील', 'पैसा जपून खर्च करा', 'गुंतवणूकीला उत्तम काळ' अशा अनेक परस्पर विरोधी विधानांतून ३६५ दिवस, १२ जन्मराशी आणि केवळ १२ वाक्ये permutations, combinations ने फिरवत भूमंडळावरील ६.७५ बिलियन्स जनतेचे भवितव्य ठरवणे ज्यांना जमते ते खरोखरच थोर आहेत. असो !

व्यक्ती तितक्या प्रकृती हे खरे असले तरीसुध्दा, तुमची जन्मतारीख १२ फेब्रुवारी असल्यास.. सर्वप्रथम, (belated) Happy Birth Day / शुभेच्छा! तुम्ही स्वत:ला अमेरिकेचे १६वे अध्यक्ष अब्राहम लिंकन व शास्त्रज्ञ चार्ल्स डार्विन अशा नामांकित व्यक्तींचे राशीबंधू/भगिनी समजायला, निदान लिंकन स्टाईल – स्टोव पाईप हॅट किंवा चार्ल्स डार्विन स्टाईल हॅट घालून मिरवायला सुरवात करावी. आपल्याला कुणी टोप्या घालतंय हा विचार दूर ठेऊन! कारण अगोदर म्हंटल्याप्रमाणे you have these great 'Connections Separated at birth.'

जागतिक इतिहासात विशेष ठसा उमटवणाऱ्या अब्राहम लिंकन व चार्ल्स डार्विन ह्या दोन अजरामर महान पुरुषांचा जन्म २०० वर्षांपूर्वी एकाच दिवशी– १८०९ मधे १२ फेब्रुवारीचा. लिंकनचा जन्म अमेरिकेत सामान्य शेतकरी कुटंबात तर डार्विनचा इंग्लंडमधील सधन ब्रिटिश घराण्यातला. जगाच्या दोन टोकाला एकाच वर्षी एकाच दिवशी जन्मलेल्या ह्या दोन थोर पुरुषांनी केवळ त्यांच्या हयातीतच नव्हे तर मानवजातीच्या भविष्याला कलाटणीपूर्ण उज्ज्वल दिशा दिली. आणि नेमका हा वैचारिक धागा Adam Gopnik लिखित 'Angels and ages' हे पुस्तक वाचल्यावर दृढ होतो. पुस्तकाच्या शीर्षकालाही ऐतिहासिक संदर्भ आहे. लिंकनच्या मृत्यूनंतर एडविन स्टंटन–(सेक्रेटरी ऑफ वॉर) यांचे "Now he belongs to..angels (की ages?)" ह्या वाक्यातील शेवटचा शब्द निश्चित न ऐकू आल्याची इतिहासात नोंद आहे.




Gopnik च्या मते angels/ages? हा शब्दसंभ्रम जनमानसातील faith/history, god/humanity हे वैचारिक द्वंदच सूचित करतो.

'Everybody evolved from Monkey' असे सांगून मानव निर्मितीचे देवबाप्पाचे क्रेडिट/श्रेय रद्द करणारा डार्विन आणि अमेरिकेतील वर्ण/वंशभेद, गुलामगिरीचा अंत करणारा लिंकन पुरोगामी विचारांचे प्रतिक. Gopnik च्या मते " It is not what they have in common with each other that matters; it is what they have in common with us." आणि हे विधान अमेरिकेचे ४४वे अध्यक्ष बराक ओबामांनी नुकतेच दृढ केले आहे. अब्राहम लिंकन यांनी अमेरिकेच्या अध्यक्ष पदाच्या आपल्या शपथविधी प्रसंगी वापरलेल्या बायबल ग्रंथास ओबामांना अमेरिकेच्या अध्यक्षीय शपथविधीप्रसंगी स्पर्श करावासा वाटला. तसेच या प्रसंगानिमित्त, १८६१ मधे अब्राहम लिंकन यांनी निवडलेले फिलाडेल्फिया ते वॉशिंग्टन रेल्वेमार्गक्रमण ओबामांनी समारंभासाठी निवडून आपल्या कारकिर्दीचा श्रीगणेशा केला. Gopnik ने लिहिल्याप्रमाणे "And that commonality lies in the modern way of speaking (plainly) and thinking (scientific and liberal in the broad sense)." म्हणूनच अशा नीतळ व्यक्तिमत्वांशी बहुतेकांच्या मनाची तार आपोआपच जुळते.

**विनता कुलकर्णी** (*vinata@gmail.com*)

# शेवटचे पान

दूरदर्शनवर रामायण मालिका चालू होती त्यावेळी सबंध भारत जसा मंत्रमुग्ध झाला होता तसेच वातावरण सध्या महाराष्ट्रातच नव्हे तर जगभर विखुरलेल्या मराठी समाजात (ज्यांचेकडे संगणकामार्फत झी मराठी चॅनेल पाहता येतो त्या घरातून) 'लिट्ल चॅम्पस'नी निर्माण केले आहे. सध्या सोमवार-मंगळवारची रात्र ही पाच मुले सर्व वयाच्या मराठी मनांवर अधिराज्यच करीत आहेत, इतकी ती मुले लोकप्रिय आहेत. अमेरिकेत माझ्या घरी झी मराठी चॅनेल नाही. पण गेले सहा आठवडे भारतात होतो त्यावेळी या रिॲलिटी शोची वेळ झाली की माझी आईसुद्धा माझ्याशी बोलणे थांबवून टीव्ही लावत असे. त्यामुळे नाईलाजाने मी हा रिॲलिटी शो बघू लागलो.

झी टीव्हीला यशाचा हा फॉर्म्युला सापडला आहे व त्याचा ते पुरेपूर फायदा उठवत आहेत. वृत्तपत्रातून- 'लहान मुलांचा असा फायदा उठवणे बरोबर आहे का?' यावर उलटसुलट चर्चा चालू आहे. वैशाली सामंत आणि अवधुत गुप्ते यांची कारकीर्द अनुक्रमे गायक आणि संगीतकार यापेक्षा या रिॲलिटी शो वरील परिक्षक म्हणून जास्त गाजत आहे. इतर नामांकित मराठी गायक, संगीत-कारच नव्हे तर इतर अनेकजण या शोवर असा ना तसा प्रवेश मिळाला तर तो न नाकारता आनंदाने उपस्थिती लावत आहेत.

पण मला कौतुक वाटले ते या पाच फायनलिस्ट मुलांची तयारी करून घेणाऱ्या आई-वडिलांचे व गुरूंचे. त्यांना शिकवली जाणारी गाणी, ही मुले रंगमंचावर गाताना स्पर्धेच्या दडपणाला न भिता ज्या सहजतेने गातात तो आत्मविश्वास, गाताना ही सर्वच मुले करीत असलेले हावभाव हे सर्व काही अजब आहे. मुख्य म्हणजे ही सर्व मुलेच नव्हे तर त्यांना रंगमंचावर वाद्यांची साथ करणारे कलाकारसुद्धा गाणे 'एंजॉय' करीत वाजवत आहेत हे बघताना प्रेक्षक निव्वळ मुलांच्या गाण्याने नाही तर त्यांच्या वागण्यानेही सुखावतो. चॅनेलवाले शोमधे 'एक्साईटमेंट' निर्माण करण्यासाठी प्रत्येक गाण्याला गुण देण्याची कोणालाही न समजणारी पद्धत शोधून काढोत, अथवा या मुलांना साप शिडीचा खेळ रंगमंचावर खेळायला लावून खोटी चुरस निर्माण करोत, या मुलांच्यात कशाने फरक पडत नव्हता व चॅनेलवाल्यांची जिरत होती. एखाद्या गाण्याला कोरसची जरूर असली तर उरलेली चार मुले डोकी जवळ करून दोन मायक्रोफोन मधे गात असत तेव्हां ते दृष्य तर निरागसपणाचा कळस असे. या सर्वच मुलांचे शब्दोच्चार इतके स्वच्छ की अनेक जुन्या गाण्यांचे संपूर्ण शब्द मला या 'लिटल चॅम्पस'मुळे नीट कळले.

या पाच जणात उजवे डावे ठरवणे खरोखरीच अवघड होते. लोकांचा कौल तेच सांगत होता. चॅनेलवाल्यांनी हा कौल शेवटी मानला व सर्व प्रेक्षकांना हायसे वाटले. मला मात्र ही निरागसता थोडा काळच टिकणार आहे या विचाराने वाईट वाटत होते. असे 'लिटल चॅम्पस' मी पूर्वीपण पाहिले आहेत. आपणही पाहिले असणार. यांचे आजचे आवाज पुढे टिकतील का? आवाज फुटण्याचे वय आले की काय होईल? आई- वडील, गुरू यांचे योग्य मार्गदर्शन भविष्यात मिळेल का? आत्ता ते लोकप्रिय गाण्याची नक्कल उत्तम करीत आहेत. संपूर्ण नवीन गाणे गायची वेळ येईल तेव्हा यांचे काय होईल? इ. प्रश्न डोक्यात विनाकारण गर्दी करीत.

अशा प्रकारच्या स्पर्धा सुरू झाल्या त्या पहिल्याच स्पर्धेत भारतात सर्वप्रथम आलेला तरूण अगदी आपल्यातलाच होता (हो, हो अमेरिकेतला). आजही तो गाण्याचे उत्तम कार्यक्रम करतो, पण ती सर्व दुसऱ्यांनी लोकप्रिय केलेली गाणी. स्वत:ची नाही. अशी अनेक उदाहरणे मला आठवली व मी काही काळ खिन्न झालो. पण हे असे चालायचेच. लताबाईंनी गायला सुरूवात केली तेव्हां त्या अशाच 'लिट्ल चॅम्पस' होत्या. नट सचिन पडद्यावर झळकला तेव्हां असाच लहान होता. अशी उदाहरणे आठवताना भविष्यात ही मुले मोठे गायक होण्याची शक्यता नाकारता येणार नाही या विचाराने मला थोडं हायसं वाटलं.

**मोहन रानडे** (*boabmm@yahoo.com*)


**COMFORT TRAVEL**

ARC **EDISON, NJ** IATA

**COMFORTTRVL@YAHOO.COM**
**Most Trusted name in the business for 15 years.**
**We proudly consolidated for :**


1. **Jet-air, Continental, Kuwait, Emirates etc.**
2. **Non Stop AI Flights to Mumbai special fares**
3. **SOTC, COX & Kings, Trafalgar Tours and Cruises**

**Please call: SHAILA SHIRVALKAR**
**TEL: 732-767-3135**



**JTI**

Crude oil and gas production in the US, India, and Colombia, South America



Joshi Technologies International, Inc.
5801 E. 41st Street, Suite 603
Tulsa, Oklahoma 74135

918.665.6419 ◇ jti@joshitech.com

www.joshioilandgas.com

## INSURANCE & REAL ESTATE

**HEALTH INSURANCE FOR VISITORS FROM ABROAD**
Reasonable Rates. Administering this program for more than 15 years.

**LIFE INSURANCE**
Lowest rates in USA. Reputable carriers

**REAL ESTATE**
Hotels/Motels, Businesses

**Administering this program for more than 25 years**

**Contact: Shashi Thakur, Ph.D.**

Tel: (901)854-9451 Fax : (901)853-4809
Cell: (901)230-3209
E-mail: shashijthakur@gmail.com

## HEALTH INSURANCE

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

* VISITORS
* H-1 B VISA HOLDERS
* PERMANENT RESIDENTS

**( Some restrictions apply)**

**For more information:**
**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**
**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: (800)204-1939

E-mail: padmajabapat@yahoo.com
Website: visitors-insurance.com

## SAVE DISABLED CHILDREN THRU FREE PLASTIC SURGERY





**PLEASE DONATE GENEROUSLY TO DR. DICKSHEET'S INDIA PROJECT**
**WWW.DRDICKSHEET.ORG**

**135 OCEAN PARKWAY 17C**
**BROOKLYN, NY 11218**
**PHONE— (718) 871-0280**
**E mail: murphy.pianoman@att.net**

*YOUR DONATION OF $150 CAN SAVE ONE CHILD*





बृहन्महाराष्ट्र वृत्त

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408
*Or call 1-215-354-1423 to pay by credit card.*
*Master Card, Visa, American Express and*
*Discover is accepted.*

